ठळक बातम्या

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी क्रोएशियात दाखल, जी सेव्हन देशांच्या प्रमुखांसोबत जागतिक आव्हानं आणि सामायिक आकांक्षांवर चर्चा

- राष्ट्रीय महामार्गांवरच्या टोलसाठी १५ ऑगस्टपासून ३ हजार रुपयांत पास मिळणार

- एकीकृत निवृत्तीवेतन योजनेअंतर्गत सर्व केंद्रसरकारी कर्मचाऱ्यांना जुन्या निवृत्तीवेतन योजनेप्रमाणेच अंशदान आणि सेवानिवृत्तीचे इतर लाभ मिळणार

- कवी सुरेश सावंत आणि कादंबरीकार प्रदीप कोकरे यांना साहित्य अकादमी पुरस्कार जाहीर

आणि

- इस्त्राइल विरुद्धच्या युद्धात माघार घेण्याचं अमेरिकेचं आवाहन इराणनं फेटाळलं

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज क्रोएशियामधल्या झग्रेब शहरात पोहोचले. क्रोएशियाचे प्रधानमंत्री आंद्रेज प्लेनकोविच यांनी विमानतळावर त्यांचं स्वागत केलं. यावेळी प्रधानमंत्री मोदी यांच्या स्वागतासाठी स्थानिक कलाकारांनी पारंपरिक सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी क्रोएशियाचे प्रधानमंत्री आंद्रेज प्लेनकोविच यांच्याशी शिष्टमंडळ स्तरावर चर्चा करणार आहेत. तसंच दोन्ही नेते मार्क्स स्क्वेअर इथल्या स्वागत समारंभात सहभागी होतील. या भेटीत दोन्ही देशात महत्त्वाच्या क्षेत्रात करार होतील आणि धोरणात्मक सहकार्य वाढवण्यावर भर दिला जाईल. विज्ञान, तंत्रज्ञान, शेती, शिक्षण आणि सांस्कृतिक क्षेत्रातले अनेक महत्त्वाचे करार भारत आणि

क्रोएशिया यांच्यात होणार आहेत. तसंच झग्रेब मधल्या विद्यापीठातल्या हिंदी अध्यासन केंद्राचा विस्तार केला जाईल, त्यामुळे भारताच्या भाषिक आणि शैक्षणिक प्रसाराला चालना मिळेल.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी क्रोएशियाचे राष्ट्राध्यक्ष झोरन मिलानोविच यांचीही भेट घेतील. भारताच्या दहशतवादाविरोधातल्या लढ्याला आणि संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेत भारताला कायमस्वरुपी सदस्यत्व मिळण्यासाठी क्रोएशियानं पाठिंबा दिला आहे, त्या पार्श्वभूमीवर ही भेट महत्त्वाची मानली जात आहे.

<><><><><>

कॅनडामधील कनानास्किस इथं झालेल्या जी-सेव्हन संपर्क शिखर परिषदेच्या वेळी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी जी-सेव्हन नेत्यांसोबत प्रमुख जागतिक आव्हानं आणि सामायिक आकांक्षांवर चर्चा केली. बदलत्या जगात भविष्यातली ऊर्जा सुरक्षितता, तंत्रज्ञान, पायाभूत सुविधा आणि गुंतवणूकीच्या जी-सेव्हन चर्चेत त्यांनी भाग घेतला. शाश्वत आणि हरित मार्गानं सर्वांसाठी ऊर्जा सुरक्षिततेची खात्री करण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली आणि या करता आंतरराष्ट्रीय सौर आघाडी, आपत्ती प्रतिरोधक पायाभूत सुविधा परिषद आणि जागतिक जैव इंधन आघाडी यासारख्या भारताच्या जागतिक उपक्रमांवर सविस्तर चर्चा केली. विकसनशील देशांसमोरची आव्हानं विशद करुन त्यांनी सांगितलं की भारतानं या देशांचा आवाज जागतिक व्यासपीठावर पोहोचवण्याची जबाबदारी घेतली आहे. जी-सेव्हन शिखर परिषदेत प्रधानमंत्री मोदी सलग सहाव्यांदा सहभागी झाले.

<><><><><>

महामार्गांवरचा प्रवास स्वस्त, सुलभ करण्याच्या उद्देशानं येत्या १५ ऑगस्टपासून वार्षिक फास्टॅग पास सुरू करायचा निर्णय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयानं घेतला आहे. तीन हजार रुपये किंमतीचा हा पास एका

वर्षाच्या कालावधीसाठी किंवा २०० फेऱ्यांसाठी लागू असेल. राष्ट्रीय महामार्गावर व्यक्तिगत वापराच्या वाहनांना हा पास वापरता येईल, अशी माहिती केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी दिली.

पास काढण्यासाठीची लिंक लवकरच राजमार्ग यात्रा ॲप आणि राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, तसंच रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाच्या अधिकृत संकेतस्थळांवर उपलब्ध होईल.

<><><><><>

एकीकृत निवृत्तीवेतन योजनेअंतर्गत सर्व केंद्रसरकारी कर्मचाऱ्यांना जुन्या निवृत्तीवेतन योजनेप्रमाणेच अंशदान आणि सेवानिवृत्तीचे इतर लाभ मिळणार आहेत. केंद्रीय कार्मिक, गाऱ्हाणी आणि निवृत्तीवेतन विभागाचे मंत्री डॉ. जितेंद्र सिंग यांनी ही घोषणा केली. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सरकारला ११ वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त नवी दिल्लीत आयोजित पत्रकारपरिषदेत आज ते बोलत होते. निवृत्तीवेतनधारकांच्या तक्रारींच्या निवारणासाठी राबवलेल्या तसंच कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षणासाठी उपक्रमांचा उल्लेख सिंग यांनी केला. प्रसूतीच्या वेळी अपत्याचा मृत्यू झाला असला

तरीही महिला कर्मचाऱ्यांना प्रसूती रजेचा फायदा, निवृत्तीवेतनधारकांना

डिजिटल स्वरुपात हयातीचे दाखले इत्यादी सुधारणांची माहिती डॉ. सिंग यांनी दिली.

भ्रष्टाचारमुक्त आणि तत्पर प्रशासनासाठी केलेल्या उपाययोजनांबद्दल त्यांनी सांगितलं. दैनंदिन कामकाजात क्षमता आणि दर्जा सुधारण्यासाठी कर्मयोगी मंचाचा वापर करण्यात आला आहे. तसंच रिक्त पदं भरण्यासाठी ठोस पावलं उचलण्यात येत आहेत असं ते म्हणाले. रोजगार मेळाव्यांच्या माध्यमातून सुमारे साडेचार लाख रिक्त पदं भरली गेली आणि १९ हजार पदोन्नती प्रकरणं वेगाने निकाली निघाली असं सिंग यांनी सांगितलं. नागरिक प्रथम, राष्ट्र प्रथम या तत्त्वानुसार सार्वजनिक

तक्रार मंचांवर कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापरातून दरवर्षी सुमारे २६ लाख तक्रारींचा निपटारा केला जातो असंही ते महणाले. कार्मिक विभागाचे वरिष्ठ अधिकारी या पत्रकारपरिषदेला उपस्थित होते.

<><><><><>

भारतात सर्व कायदेशीर, व्यावसायिक आणि डिजिटल प्रणालींमध्ये लवकरचं भारतीय प्रमाण वेळेचा वापर अनिवार्य करणार असल्याचं ग्राहक व्यवहार, अन्न आणि सार्वजनिक वितरण मंत्री प्रल्हाद जोशी यांनी म्हटलं आहे. त्यांच्या अध्यक्षतेखाली वेळेच्या प्रसारणाबाबतची परिषद आज नवी दिल्लीत झाली. कायदेशीर मापन कायद्याअंतर्गत लवकरच नियम सूचित केले जातील असं त्यांनी सांगितलं. राष्ट्रीय भौतिक प्रयोगशाळा आणि
इस्रो यांच्या सहकार्याने हा प्रकल्प राबविण्यात येत आहे.

<><><><><>

राज्य शिक्षण मंडळाच्या मराठी आणि इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये इयत्ता पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांना हिंदी भाषा ही तृतीय भाषा म्हणून अनिवार्य नाही, असं राज्य सरकारनं स्पष्ट केलं आहे. यासंदर्भात सरकारने शुद्धीपत्रक जारी केलं. आता विद्यार्थ्यांना हिंदी ऐवजी इतर भारतीय भाषा निवडण्याचा पर्याय असून, किमान २० विद्यार्थी इच्छुक असतील तर शिक्षक नियुक्ती किंवा ऑनलाईन शिक्षणाची व्यवस्था करता येईल, असं या पत्रकात म्हटलं आहे. राज्यातल्या सर्व शाळांमध्ये मराठी भाषा अनिवार्य असल्याचंही यात स्पष्ट केलं आहे. यासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस म्हणाले...
होल्ड

- मुख्यमंत्री बाइट

विविध राजकीय पक्षांनी या निर्णयाला विरोध केला आहे. काल जारी केलेल्या शासन आदेशात शब्दछल करून हिंदी सक्ती ठेवली आहे. केवळ शब्द बदलल्यानं

त्याचा आशय बदलत नाही, असं काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले. हिंदी ही राष्ट्रभाषा नाही, तर काही राज्यांची भाषा आहे. काही सनदी अधिकाऱ्यांच्या दबावामुळे हिंदी भाषेच्या सक्तीचा घाट घातला जात असल्याचा आरोप मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी केला.

<><><><><>

साहित्य अकादमीनं वार्षिक बाल साहित्य आणि युवा पुरस्कारांची घोषणा आज केली. मराठी भाषेसाठी सुरेश सावंत यांच्या 'आभाळमाया' या कवितासंग्रहाला बाल साहित्य पुरस्कार मिळाला आहे. तर युवा पुरस्कार प्रदिप कोकरे यांच्या 'खोल खोल दुष्काळ डोळे' या कादंबरीला मिळाला आहे. सिंधी भाषेसाठी मुंबईत राहणाऱ्या मंथन बचाणी यांच्या 'पांधीअड़ो' या कविता संग्रहाची 'युवा' साहित्य अकादमी पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.

स्मृतीचिन्ह आणि ५० हजार रुपये रोख असं या पुरस्कारांचं स्वरुप आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी पुरस्कार विजेत्यांचं अभिनंदन केलं आहे.

<><><><><>

मतदारांना नोंदणी केल्यापासून १५ दिवसांच्या आत मतदान ओळखपत्र देण्याचा निर्णय निवडणूक आयोगानं घेतला आहे. मतदारांनी नोंदणी केल्यानंतर किंवा सुधारणा केल्यावर त्यांना त्यांचं ओळखपत्र लवकरात लवकर मिळावं यासाठी निवडणूक आयोगाने नवीन प्रणाली विकसित केली आहे.

<><><><><>

अहमदाबादमध्ये झालेल्या विमान अपघातातल्या २०८ मृतांची डीएनए चाचणीतून ओळख पटली आहे. त्यापैकी १७३ मृतदेह कुटुंबियांच्या ताब्यात दिल्याची माहिती अहमदाबाद सिव्हिल रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. राकेश जोशी यांनी दिली.

<><><><><>

आंध्र प्रदेशातल्या अल्लुरी सीताराम राजू जिल्ह्यात आज झालेल्या चकमकीत तीन नक्षलवादी ठार झाले. मृतांमधे गजराला रवी उर्फ उदय, अरुणा आणि अंजू यांचा समावेश आहे. घटनास्थळावरून मोठ्या प्रमाणात शस्त्रास्त्र जप्त केल्याचं पोलिसांनी सांगितलं. या परिसरात १६ नक्षलवादी असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती.

<><><><><>

इस्त्रायल विरुद्धच्या युद्धात शरणागती पत्करण्याचं अमेरिकेचं आवाहन इराणनं फेटाळलं आहे. इराण शरणागती पत्करणार नाही. अमेरिकेनं इराणवर हल्ला केला तर, त्यांना त्याचे गंभीर परिणाम भोगावे लागतील, असा इशाराही इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खोमेनी यांनी दिला आहे. युद्ध सुरू झालं असून इस्त्रायलला कोणतीही दया न दाखवता कठोर प्रत्युत्तर द्यावं लागेल, असा इशारा त्यांनी दिला.

या संघर्षाच्या सहाव्या दिवशी इराणमधल्या सेंट्रीफ्यूज आणि शस्त्रास्त्र उत्पादन कारखान्यांवर हल्ले केल्याचा दावा इस्त्रायलनं केला आहे. इराणनं इस्त्रायलवर आणखी क्षेपणास्त्रं डागल्यानंतर हे हल्ले केले, त्यात हवाई दलाच्या ५० हून अधिक लढाऊ विमानांनी भाग घेतला, असं इस्त्रायलच्या संरक्षण दलांनी म्हटलं आहे. आयएईए, अर्थात आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा एजन्सीनं याला दुजोरा दिला आहे.

<><><><><>

इराणमधून सुटका केलेले ११० भारतीय विद्यार्थी उद्या पहाटे नवी दिल्लीत पोहोचणार आहे. ऑपरेशन सिंधू अंतर्गत या विद्यार्थ्यांना मायदेशी आणलं जात असल्याचं परराष्ट्र मंत्रालयानं सांगितलं.

//<><><><><>//